I-O

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** पारनेर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0600 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**01/07/2023 13:19

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 24/05/2023
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 24/05/2023
**Time From (वेळेपासून):** 17:17 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:46 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 01/07/2023 **Time (वेळ):** 12:42 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 016
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/07/2023 12:42 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय, पारनेर येथील प

(c)**In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** दत्तात्रय हरीभाऊ तितर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कुरूंद ता पारनेर,पारनेर ,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कुरूंद ता पारनेर,पारनेर ,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विठठल मच्छिंद्र काकडे पुरवठा | | | 1. तहसिल कार्यालय,पारनेर ता पा,पारनेर ,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any.**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दि.01/07/2023

मी दत्तात्रय हरीभाऊ तितर, वय-32 वर्षे, धंदा-स्वस्त धान्य दुकान सेल्समन यादववाडी ता. पारनेर जि. अहमदनगर रा. कुरूंद ता. पारनेर जि.अहमदनगर मो.नं.9850782513.

समक्ष फिर्याद देतो की, मी वरील पत्यावर कुटुंबासह राहण्यास असुन मी दि.24/05/2023 रोजी पोलीस उपअधीक्षक श्री. लोखंडे यांना फोनवरून संपर्क करून एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणीची तक्रार असुन मी आपल्या कार्यालयात येतो असे कळविले होते. त्यानुसार मी ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर कार्यालयात हजर झालो व श्री लोखंडे यांचे सुचनेवरून पोनि गोर्डे यांना भेटुन त्यांना एका लोकसेवका विरूध्द लाच मागणीची तक्रार असलेबाबत कळविले. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी त्यांची स्वतःची, कार्यालयात हजर असलेले पोना चैधरी, पोकॉ कराड व पोकॉ सुद्रुक यांची व पंचांची यांची ओळख करून दिली. तेथे पोनि गोर्डे यांनी मला माझी तक्रार थोडक्यात सांगण्यास सांगितली असता मी माझी तक्रार तोंडी सांगितली. ती अशी, '' मी वरील ठिकाणचा रहिवाशी असुन यादववाडी गावातील जय जवान बचत गटाचे स्वस्त धान्य दुकान एफपीएस आयडी 152213400306 यावर सदर बचत गटाच्या ठरावानुसार 2020 पासुन सेल्समन म्हणुन कामकाज पाहत आहे. सदर स्वस्त धान्य दुकानातील धान्य वितरण करणे,तहसिल कार्यालय, पारनेर येथे सदर वितरणाबाबत माहिती देणे, मंजुर स्टॉक चलन भरणे, स्टॉक घेणे व त्यांचे शासकिय लाभार्थी यादीनुसार यादववाडी येथे वितरण करणे असे माझे कामकाज आहे. सदर कामाच्या मोबदल्यात सदर बचत गट मला कमीषनरूपी वेतन करते. मागील सुमारे तीन महिन्यापासुन यादववाडी जवळचे वाडेगव्हाण या गावातील पंचवीस ते तीस रेशनधान्य लाभार्थी यांनी त्यांचे रेशनकार्डवर यादववाडी रहीवाशी पत्ता असल्याने तसेच एक देश एक रेशनकार्ड या शासनाच्या योजनेनुसार त्यांना मी रितसर धान्य पुरवठा केला आहे.

दिनांक 22/05/2023 रोजी तहसिल कार्यालय पारनेर येथे स्वस्त धान्य दुकान सेल्समन यांची मासिक बैठक होती. ती बैठक आटोपल्यानंतर मी यादववाडीचे संदर्भ रजिस्टर प्रमाणित करण्यासाठी तहसिल कार्यालय, पारनेर येथील पुरवठा अधिकारी, श्री काकडे यांची भेट घेवुन रजिस्टर त्यांचेकडुन प्रमाणित करून घेतले. त्यानंतर त्यांनी मला सांगितले की, तु बेकायदेषीर दुसÚया गावच्या लोकांना धान्य वाटप करतो. वाडेगव्हाण चे पंचवीस ते तीस रेषन लाभार्थी मागील तीन महिन्यापासुन तुझ्याकडुन स्वस्त धान्य घेत आहेत. त्यामुळे तुला रेकॉर्डवर घेवुन तुझा कसुरी अहवाल तयार करून तुझ्यावर कार्यवाही करील. त्यावेळी मी त्यांना माझे काम नियमानुसार आहे असे म्हणालो असता ते म्हणाले मी काहीही करू शकतो जर तुला कार्यवाही पासुन वाचायचे असेल तर तु मला 20,000/- रूपये दे, ते दिल्यास मी तुला रेकॉर्डवर घेणार नाही ते असे म्हणाल्यामुळे माझ्या लक्षात आले की श्री. काकडे हे मला कारवाईची भिती दाखवुन माझ्याकडे लाच मागणी करत आहेत. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही. आज श्री. काकडे यांनी मला भेटण्यास बोलावले आहे. त्यानुसार मी त्यांची समक्ष भेट घेवुन माझ्या कामाबाबत चर्चा करणार आहे. त्या दरम्यान श्री. काकडे यांनी माझ्याकडे लाच मागणी केल्यास त्यांच्या विरूध्द कारवाई करण्यास विनंती आहे. माझ्यात व श्री. काकडे यांच्यात कोणताही आर्थिक व्यवहार नाही. तसेच आमच्यात कोणताही वैरभाव नाही. श्री. काकडे यांनी लाच मागणी केल्यास सदर लाच रक्कम मी माझ्या बचतीतुन हजर करील अषी तक्रार दिली. पोनि गोर्डे यांनी मला माझी वरील तक्रार स्वहस्ताक्षरात लिहुन देण्यास सांगितली असता ती मी माझे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली.सदर तक्रारीवर मी सही केली व त्यानंतर दोन्ही पंच व पोनि गोर्डे यांनी सहया केल्या.

त्यावेळी मला लोकसेवक काकडे यांनी वाडेगव्हाण येथे आल्यावर फोन कॉल करण्याचे सांगितले आहे असे मी पोलीस निरीक्षक श्री. गोर्डे यांना सांगितले. त्यानुसार मी, पोनि श्री.गोर्डे, दोन्ही पंच व सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व साहित्यासह शासकिय वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर कार्यालयातुन निघुन नगर-पुणे रोडने वाडेगव्हाण गावचे षिवारात सुरक्षित ठिकाणी आलो.

त्यानंतर मी श्री काकडे यांचे विरूध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पोनि गोर्डे यांनी लाच मागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर पोनि गोर्डे यांचे सुचनेवरुन पोना चैधरी यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नविन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकॉर्डर चालू करून, त्या मेमरी कार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये पोनि गोर्डे, दोन्ही पंच व माझे उपस्थितीबाबत निवेदन रेकॉर्ड केले.

त्यानंतर माझे मो.नं. 9850782513 यावर लोकसेवक काकडे यांचा मो.नं.7744972065 यावरुन कॉल आला परंतु तो उचलण्यापुर्वी बंद झाला. त्यानंतर मी पोनि गोर्डे यांचे सुचनेप्रमाणे माझे मोबाईल क्रं. 9850782513 वरुन लोकसेवक काकडे यांचे मोबाईल क्रं. 7744972065 वर कॉल करुन मोबाइल फोनचा स्पिकर चालू करुन बोलणे केले. त्यामध्ये लोकसेवक काकडे यांनी मला पारनेर येथे भेटण्यासाठी बोलाविले. तो कॉल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात आला.

लोकसेवक काकडे यांनी मला पारनेर येथे भेटण्यासाठी बोलावले असल्याने सर्वानुमते पारनेर येथे जावुन पडताळणी करण्याचे ठरले. त्यानुसार आम्ही सर्वजण राळेगण फाटा येथे आलो, त्यावेळी मी माझी राळेगण फाटा बस स्टॅण्डवर पार्क केलेली मोटार सायकल घेवुन व पोनि गोर्डे, पंच, सापळा पथक असे शासकिय वाहनाने निघुन पारनेर शहराच्या अलीकडे सुरक्षित ठिकाणी येवुन थांबलो.

त्यानंतर पोनि गोर्डे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन पंच नं 1 यांचेसह मला माझे मोटार सायकल क्रं. एम. एच.12 आर झेड-3896 वरून रवाना केले. त्याप्रमाणे मी काकडे यांची तहसिल कार्यालय, पारनेर येथील पुरवठा विभागामध्ये जावुन भेट घेतली असता माझे व लोकसेवक काकडे यांचेत कामासबंधाने चर्चा झाली. सदर चर्चे दरम्यान मी त्यांना कोर्टा बिर्टाचं काय व्हायचं नाही ना, माहया लई डोक्याला सिन रातभर झोप नाही आली. त्यावर लोकसेवक काकडे यांनी मी तुला शब्द दिल्यावर काही होईल का? कोण सोडायला येईल, मीच करील ना, काळजी नको करू, मी शब्द दिला काही होणार नाही असे म्हणाले, त्यावेळी मी त्यांना काही कमी कराना काहीतरी असे म्हणालो असता लोकसेवक काकडे यांनी वीस देना मग.. असे म्हणुन लाच मागणी केली. त्यावर मी त्यांना वीस काय? वीस रूपये असे म्हणालो, त्यावेळी लोकसेवक काकडे हे मोठयाने हसले. त्यावेळी लोकसेवक काकडे यांनी पंचाकडे पाहुन भाऊ आहे का? असे विचारले असता मी त्यांना माझ्या बहिणीचा मुलगा भाचा आहे असे सांगितले. त्यांनतर मी त्यांना वीस रूपये का? असे विचारले असता लोकसेवक काकडे यांनी दे वीस..त..वीस, जावु दे, असे म्हणुन पुन्हा लाच मागणी केली. त्यानंतर मी त्यांना कमी कराना काही असे म्हणालो असता लोकसेवक काकडे यांनी कागदावर 15 असे लिहुन दाखविले. त्यावेळी मी त्यांना 15 रूपये का? असे विचारले, त्यावेळी लोकसेवक काकडे यांनी सोई..सोईने.. असे म्हणुन कागदावर 15000 असे अंकात लिहुन दाखविले व उदया डाक्युमेंट घेवुन ये, तुझ्या मनाने काय असन ते दे.. असे म्हणत कागदावर लिहीलेल्या 15000 रूपये कडे बोट दाखवुन उदया घेवुन ये, असे म्हणून माझेकडे पंचासमक्ष 15000/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावर मी त्यांना मला त्रास व्हायला नको, माहया मनाने नको बुवा.. असे म्हणालो. त्यावेळी लोकसेवक काकडे यांनी कागदावर लिहीलेल्या 15000 रूपये कडे बोट दाखवुन म्हणुनच म्हणलो.. असे म्हणुन मी सेल्समन म्हणुन चालवित असलेल्या स्वस्त धान्य दुकानातुन वाडेगव्हाण चे रेशन लाभार्थी यांना मागील तीन महिन्यापासुन बेकायदेषीर धान्यवाटप केले असे म्हणुन माझेवर कारवाई न करण्यासाठी पंचासमक्ष चर्चे दरम्यान माझेकडे लाचेची मागणी करून तडजोडीअंती 15,000/-रूपये लाचेची मागणी करून ती स्विकारण्याची तयारी दर्शविली याबाबत खात्री झाली. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी मला लोकसेवक काकडे यांना दयावयाची लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितले असता, मी लोकसेवक काकडे यांनी दि. 25/05/2023 रोजी लोकसेवक काकडे यांनी त्यांना लाच रक्कम व कागदपत्रे घेवुन बोलाविले असल्याचे सांगितले, त्यामुळे सदरची कारवाई तात्पुरती स्थगित करून दिनांक 25/05/2023 रोजी आयोजित करण्याचे ठरले होते.

त्यानंतर दि. 25/05/2023 रोजी मी माझे मोटार सायकलसह पारनेर ते सुपा जाणारे रोडवर सुरक्षित ठिकाणी थांबलो असता त्याठिकाणी पोनि गोर्डे, दोन्ही पंच व स्टाफ असे शासकिय वाहनाने आले.त्यानंतर मी लाच म्हणुन देण्यासाठी हजर केलेल्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावुन प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. अॅन्थ्रासिन पावडर लावलेल्या लाचेच्या नोटा माझ्या शर्टाचे डाव्या खिशात ठेवुन मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकाला पोनि गोर्डे यांनी आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नविन मेमरीकार्ड घालून, त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची माझी व पंचाची खात्री करून दिली व लाच रककम स्विकारल्यानंतर त्याबाबत नियोजित इशारा ठरवुन दिला.

त्यानंतर पोनि गोर्डे यांचे सुचनेवरून पोना चैधरी यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालू करून माझे ताब्यात देवुन मला पंच नं.

1यांचेसह लोकसेवक काकडे यांची भेट घेण्याकरीता तहसिल कार्यालय,पारनेर येथे जाण्यासाठी माझेकडील टि.व्ही. एस स्टार सिटी क्रं. एम.एच.12 आर झेड-3896 ने 13.05 वाजता रवाना केले. आमचे पाठोपाठ पोनि गोर्डे, पंच नं. 02, सापळा पथकातील कर्मचारी असे शासकिय वाहनाने येवुन तहसिल कार्यालय, पारनेर कार्यालयात व कार्यालयाचे बाहेर कोणास काही एक संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन थांबले. पोनि गोर्डे व सापळा पथक आल्याची खात्री झाल्यानंतर मी व पंच नं. 1 असे तहसिल कार्यालयामध्ये लोकसेवक काकडे यांची भेट घेण्यासाठी त्यांचे कक्षात गेलो असता सदर ठिकाणी काकडे हे हजर नसल्याचे दिसले. त्यानंतर मी त्या कार्यालयातील एका टेबलजवळ जावुन तेथे हजर असलेल्या कर्मचांयाकडे श्री. काकडे साहेबांबददल विचारले असता त्यांनी ते बाहेर गेल्याचे सांगितले, त्यानंतर मी व पंच नं.1 अशांनी श्री. काकडे यांचा तहसिल कार्यालयातील इतर कक्षात जावुन पाहिले असता श्री. काकडे हे त्याठिकाणी दिसले नाहीत. त्यानंतर मी लोकसेवक श्री.काकडे यांना त्यांचे मोबाईलवर फोन केला परंतु काकडे यांनी माझा फोन घेतला नाही. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे तहसिल कार्यालयामध्ये श्री. काकडे यांची येण्याची बराच वेळ वाट पाहिली परंतु श्री. काकडे आले नाहीत, त्यांनतर मी लाच स्विकारलेबाबत नियोजित इशारा न करता मी व पंच नं. 1 असे रवाना केले त्या ठिकाणी परत आलो, आमचे पाठोपाठ सापळा पथक देखील तेथे आले, त्यावेळी सदर बाबत मी व पंचानी पोनि गोर्डे यांना माहिती दिली. तसेच लोकसेवक काकडे हे कार्यालयात हजर झाल्यानंतर अथवा त्यांनी माझेशी संपर्क केल्यास मी आपणास कळविल असे पोनि गोर्डे यांना सांगितले होते. त्यानंतर सदरची सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली होती.

त्यानंतर वेळोवेळी मी तहसिल कार्यालय, पारनेर येथे माहिती घेतली असता लोकसेवक काकडे हे तहसिल कार्यालयात हजर नसल्याबाबत समजले होते. त्यानंतर दिनांक 13/06/2023 रोजी मला तहसिल कार्यालय, पारनेर येथील कॉम्प्युटर ऑपरेटर श्री. रोहकले यांनी त्यांचे मोबाईल क्रं. 8830122133 वरून माझे मोबाईल क्रमांक 9850782513 वर कॉल करून मला काकडे साहेबां सबंधी बोलायचे असे म्हणुन मला वाडेगव्हाणजवळ बोलविले, मी त्यांचेकडे गेलो असता त्यांनी मला सांगितले की, काकडे साहेबांचा निरोप आहे की, त्यांचेविरूध्द तु एसीबी कडे तक्रार दिलेली आहे का? असे विचारले असता मी त्यांना नाही असे म्हणालो, त्यावर ते म्हणाले काकडे साहेब तुझे काम करून देण्यास तयार आहेत.तुमच्यात काही वाद असेल तर मिटुन घ्या असे म्हणाले व ते निघुन गेले. त्यानंतर सदर प्रकार मी पोनि गोर्डे यांना सांगितला.

त्यावरुन माझी पुर्ण खात्री झाली की, काकडे यांना माझा काहीतरी संषय आला असल्यामुळे त्यांनी माझेकडे मागणी केलेली 15000/- रूपये लाच रक्कम भविश्यात लोकसेवक काकडे हे माझेकडुन स्विकारणार नाहीत. त्यामुळे सदरची कारवाई स्थगित करण्यात यावी व आज पावेतो झालेल्या कार्यवाहीवरुन लोकसेवक काकडे, तहसिल कार्यालय, पारनेर यांचेविरुध्द कारवाई करण्यात यावी बाबतचा सविस्तर जबाब दिला. सदरबाबत पोनि गोर्डे यांनी गोपनियता बाळगण्याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मी लोकसेवक काकडे यांचेबाबत माहिती घेतली असता त्यांचे पुर्ण नाव विठठल मच्छिंद्र काकडे,पुरवठा निरीक्षक, तहसिल कार्यालय, पारनेर असे असल्याचे समजले.

तरी लोकसेवक विठठल मच्छिंद्र काकडे यांनी दि.24/05/2023 रोजी 17.17 ते 17.46 वा.चे दरम्यान तहसिल कार्यालय, पारनेर येथील पुरवठा विभागाच्या कक्षात लाच मागणी पडताळणी कारवाई च्या वेळी पंच नं.1 यांचेसमक्ष मी सेल्समन म्हणुन चालवित असलेल्या स्वस्त धान्य दुकानातुन वाडेगव्हाणचे रेषन लाभार्थी यांना मागील तीन महिन्यापासुन बेकायदेषीर धान्यवाटप केले असे म्हणुन माझेवर कारवाई न करण्यासाठी माझेकडे पंचासमक्ष लाचेची मागणी करून तडजोडीअंती 15,000/-रू. लाच रकमेची मागणी करुन ती लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविली म्हणुन माझी विठठल मच्छिंद्र काकडे, पुरवठा निरीक्षक, तहसिल कार्यालय, पारनेर ता. पारनेर जि. अहमदनगर यांचे विरूध्द फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SAMBHAJI ABHIMANYU GAYAKWAD(I (Inspector)) / 11301000362SAGM7901P

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): SAMBHAJI ABHIMAN

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 11301000362SAGM790

पोलीस ठाणे अंमलदार
पारनेर पो.स्टे.,जि.अहमदनगर